**प्रेस नोट** **दि.१६/०३/२०१९**

## वानवडी पोलीस स्टेशन

## टु-व्हिलर चालकाचे बॅगेमधुन पडलेले पाकिट पाकीटाचे मालक यांचा शोध घेऊन परत केले

दि.१२/०३/२०१९ रोजी घोरपडीबाजार पोलीस चौकी हद्दीत घोरपडीबाजार बिट मार्शल म्हणून कर्तव्यावर असणारे पोलीस नाईक सचिन लहु गवळी, पोलीस शिपाई अमोल जाधव असे पेट्रोलींग करीत असताना एक मुलगा नामे कु. प्रज्वल कांबळे घोरपडी व्हिलेज हायस्कुल, पुणे यास तो रस्त्याने जात असताना एका टु-व्हिलर चालकाचे बॅगेमधुन एक पाकिट पडल्याचे दिसल्याने त्याने सदरचे पाकीट वरील मार्शलचे कर्मचारी यांचे ताब्यात दिले असता सदर पाकीटाची खात्री केली असता त्यामध्ये ५ ए.टी.एम. कार्ड, आधार कार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, नोकरीचे ओळखपत्र इत्यादी महत्वाची कागदपत्रे मिळून आली सदर पाकीटामध्ये रोख रक्कम नसल्याचे सदर मुलाने सांगीतले. त्यानंतर सदर पाकीट मार्शलचे कर्मचारी यांनी घोरपडीबाजार पोलीस चौकीचे ड्युटी अंमलदार पोलीस हवालदार प्रशांत शांताराम ठाकरे यांचेकडे हजर केल्याने त्यांनी सर्वांनी मिळून सदर पाकीटाचे मालक श्री. राजेंद्र दंत यांचा शोध घेऊन त्यांना चौकीस बोलावून खात्री पटल्यानंतर सदरचे पाकीट त्यांचेकडे सुपूर्त केले. सदरवेळी श्री. दंत यांनी मुलगा नामे कु. प्रज्वल कांबळे व पोलीसांचे आभार मानले.

(सुनिल वि. भोसले)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
वानवडी पोलीस स्टेशन पुणे